# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com web:- www.unigug.org


जा.क्र. गो.वि./आस्था./ १५६८ /२०१९ दि. ०४/०६/२०१९

## अधिसूचना

**वाचा :- विद्यापीठ अधिसूचना क्र. गों.वि./आस्था./३७३३/२०१८ दिनांक १९/११/२०१८**

विद्यापीठ सरळसेवा पदभरती जाहिरात क्रमांक २७/२०१८ दिनांक २२/०५/२०१८ अन्वये वर्ग "अ" मधील सहाय्यक कुलसचिव, वर्ग "ब" मधील अधिक्षक, वर्ग "क" मधील सांख्यिकी सहाय्यक, निम्नश्रेणी लिपीक व वर्ग "ड" मधील उद्यानरेजा व फर्रास पदाकरीता जाहिरात प्रकाशीत करण्यात आलेली होती. तद्नुसार प्राप्त आवेदन अर्जाची छाननी प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर दिनांक १५/१०/२०१८ रोजी विद्यापीठ संकेतस्थळावर जाहिरातीमध्ये नमुद पदांची पात्र अपात्र यादी प्रकाशीत करण्यात आलेली होती. संदर्भीय अधिसुचनेनुसार पात्र अपात्र यादीवर लेखी स्वरूपात दिनांक २९/११/२०१८ पर्यंत आक्षेप मागविण्यात आलेले होते. विद्यापीठाकडे प्राप्त आक्षेपाचे निराकरण करून आक्षेपाअंती यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

तसेच दिनांक १५/१०/२०१८ रोजी प्रकाशीत यादीमध्ये विविध संवर्गात खुल्या प्रवर्गात आवेदन सादर करतांना मागासवर्गीय प्रवर्गाचे शुल्क भरल्यामुळे आवेदन अपात्र ठरविण्यात आलेले होते परंतु मा. कुलगुरू महोदयांनी सहानुभूतीपूर्वक विचार करून धोरणात्मक निर्णयान्वये जे आवेदन शुल्क ५०० ऐवजी ३०० भरल्यामुळे अपात्र ठरविण्यात आलेले होते अश्या सर्व उमेदवारांचे आवेदन अर्ज पात्र ठरविण्यात आलेले आहे. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी व आक्षेपाअंती प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीचे अवलोकन करावे.

(डॉ. ईश्वर एस. मोहुर्ले)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**प्रतिलिपी माहितीस्तव सादर:-**

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली .
२. मा. प्र-कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.